# पोलीस रेकॉर्ड वरील गुन्हेगारास बेकायदेशीर पिस्तुल व काडतुसे घेवून फिरत असताना गुन्हे शाखा युनिट १ कडील अधिकारी व स्टाफने घेतले ताब्यात

गुन्हे शाखा युनिट १ कडील अधिकारी व कर्मचारी असे शिवाजीनगर परिसरामध्ये दाखल असलेल्या गंभीर गुन्हयामधिल आरोपीचा शोध शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे हद्दीत फिरत असताना, पो ना सचिन जाधव यांचे बातमीदारा कडुन खात्रीशीर बातमी मिळाली की, दळवी हॉस्पिटलचे बाजुचे बोळात एक इसम येणार असुन, त्यांचे जवळ एक पिस्तुल आहे, अशी खात्रीशीर माहिती प्राप्त झालेने, ती त्यांनी पो उप निरी श्री हर्षल कदम यांना सांगितली असता, लागलीच त्यांनी सदर बाबत वरीष्ठांना सदरची माहिती कळवुन, वरिष्ठांचे सुचना प्रमाणे सदर ठिकाणी छापा मारला असता, नमुद ठिकाणी इसम नामे - अनिल अशोक तुपेरे वय २० वर्षे, रा. राजेंद्र नगर, विवेकश्री अपार्टमेंट, १००५, नवीपेठ, पुणे ३० यास ताब्यात घेवून त्याची अंगझडती घेतली असता, त्याचेकडे एक देशी बनावटीचे पिस्तुल, व तीन जिवंत काडतुसे असे मिळून आले., वरील इसमा वर आर्म्स ॲक्ट ३(२५), व मुंबई पोलीस कायदा कलम ३७(१)१३५ प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील नमुद इसम हा पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन, **त्याचे विरूध्द पुणे शहरामध्ये शरिराविरूध्दचे /खुनाचे प्रयत्नाचे दोन गुन्हे दाखल आहेत.**

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे सो., पोलीस उप-आयुक्त, गुन्हे. श्री सुरेश भोसले सो., सहा.पोलीस आयुक्त, श्री समिर शेख सो. सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, स.पो.निरी. धनंजय कापरे, पोलीस उप-निरीक्षक हर्षल कदम, पो उप निरी दिनेश पाटील, सहा पो फौजदार राजाराम सुर्वे, सचिन जाधव, इम्रान शेख, तुषार खडके, इरफान मोमिन, श्रीकांत वाघवले, पो.शि. प्रशांत गायकवाड, मोहन येलपले, पो.शि. गजानन सोनुने, पो.हवा. प्रकाश लोखंडे, अशोक माने, उमेश काटे, राजू पवार यांनी केली आहे.

**पोलीस उप आयुक्त,**
**गुन्हे, पुणे शहर**